# *मांडव पध्द्तीने भाजीपाला लागवड करून उत्पन्नात वाढ*

मी सदाराम महारु कोरेटी, पाउलझोला या गावातील एक आदिवासी शेतकरी माझ्याकडे ५ एकर कोरडवाहू जमीन असल्याने व फक्त ३ एकर भागातच धानाची शेती करायचो बाकीची जमीन जंगल भागातील असल्याने व पाण्याची कुठलीही व्यवस्था नसल्या कारणाने पडीक अवस्थेत होती, माझ्या कुटुंबात पाच सदस्य असून सर्वांची उपजीविका हि या शेतीवरच व मजुरी वर अवलंबून होती. २०१५ साली मला नागेश्वरा चेरीटेबल ट्रस्ट या संस्थाचे अधिकारी मला भेटले त्यांनी मला नाबार्ड वाडी परियोजना अंतर्गत माझ्या पडिक जमिनीत आंबा, जांब आणि निम्बुचे एका एकरमध्ये झाडे लावण्यास समजावले. त्यानंतर एक एकरमध्ये मी या झाडांची लागवड केली, आणि या परियोजना अंतर्गत माझ्या पडीक जमिनीमध्ये दहा वाडी धारक शेतकरी मिळून borewell करून दिली आणि यामुळे माझ्या शेतीमध्ये पाण्याची व्यवस्था झाली आणि आता मी माझ्या वाडी मध्ये बारमाही आंतरपीक घेण्यास सुरवात केली तसेच नाबार्ड मार्फत मला भाजीपाला व वेलवर्गीय भाजीपाला मांडव पद्धतिने लागवड करण्यासाठी बिज आणि अन्य मांडव चे सामान मिळाले त्यामुळे आता मी माझ्या शेतात मिरची, पालक, संभार, वांगे, टमाटर,चवळी, लवकी, दोडका, कारली, वालाची शेंग इत्यादी प्रकारचे उत्पादन घेऊन जवळच्या बाजार मध्ये विकून मी महिन्याचे ७००० रुपयाचे उत्पन्न कमावतो. या मुळे सध्या माझी आर्थिक परिस्थिती चांगली झाली असून आता मी मजुरी करण्याची गरज नाही राहिली आणि माझी शेती बागायती झाली आता मी माझ्या कुटुंबाची गरज भागवून अतिरिक्त उत्पन्न कमावतो.या वाडी परियोजने मुळे खरोखरच मला व माझ्या कुटुंबाला लाभ झाला व त्यामुळे माझा आर्थिक विकास झाला.





****************